-- फिर्यादी प्रत --

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** लोहा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0047 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/02/2026 17:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 16/02/2026
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2026
**Time From (वेळेपासून):** 10:14 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/02/2026 **Time (वेळ):** 16:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 025
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/02/2026 16:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** गट शिक्षण अधिकारी कार्यालय लोह,लोहा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

पोलीस ठाणे लोहा जि. नांदेड

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** अनिता नामदेव चव्हाण
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | HARMUL,लातुर ग्रामीण ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक नांदेड ,नांदेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8237423007

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिंगबर रामचंद्र शिंदे | | | 1. जि प केंद्रीय प्रा शा रिसनगाव, लोहा,लोहा,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रू.दराच्या 06नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक:-16/02/2026

मी अनिता नामदेव चव्हाण, वय 40 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक नांदेड परिक्षेत्र, नांदेड मोबाईल क्रमांक 8237423007

सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील सहा महीन्यापासुन पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.आम्ही दिनांक 12/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक नांदेड परिक्षेत्र नांदेड येथे कार्यालयात हजर असतांना मा.पोलीस अधीक्षक श्री संदीप पालवे, लाचलुचपत प्रतिबंधक नांदेड परिक्षेत्र नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार ज्ञानोबा दत्तात्रय नलबलवार वय 55 वर्ष व्यवसाय नोकरी, पद प्राथमिक शिक्षक, नेमणूक जिल्हा परिषद शाळा भाद्रा, ता. लोहा, जिल्हा नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले. त्यावरून आम्ही तक्रारदार ज्ञानोबा दत्तात्रय नलबलवार यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी कळविले की, सन 2018 पासुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भाद्रा, ता.लोहा, जि. नांदेड येथे प्राथमिक शिक्षक या पदावर कार्यरत आहे. माझ्या खाजगी कारणास्तव दिनांक 09/02/2026 रोजी 46 दिवसाची दिनांक 02/02/2026 ते दिनांक 19/03/2026 रोजी पर्यत अर्जित रजा मंजूर होणे करीता गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती लोहा, ता.लोहा, जि.नांदेड येथे अर्ज दिला होता.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रिसनगाव ता.लोहा जि.नांदेड येथील दिंगबर शिंदे, पद केंद्र प्रमुख हा पंचायत समिती लोहा कार्यालय मध्ये आस्थापना विभागामध्ये लिपीकचे काम तसेच गट शिक्षण अधिकारी व्यवहारे साहेबांचे सर्व कार्यालयीन कामे पाहतो. त्यामुळे मी दिनांक 11/02/2026 रोजी माझी अर्जित रजा मंजुर झाली की नाही यासाठी पंचायत समिती लोहा कार्यालय येथे शिंदे कडे गेलो होतो.

माझ्या अर्जित रजा मंजुरी विषयी विचारणा केली असता त्यांनी मला सांगितले की, तुमची अर्जित रजा मंजूर करायची असेल तर मला व गट शिक्षण अधिकारी व्यवहारे साहेबांना 4000/- रू दयावे लागतात. पैसे दिले तरच तुमची अर्जित रजा मंजुर होईल असे म्हणुन मला लाचेची मागणी करीत आहेत.

माझी अर्जित रजा मंजुर करण्यासाठी दिंगाबर शिंदे व गट शिक्षण अधिकारी व्यवहारे हे मागत असलेले पैसे ही लाच असल्याची मला खात्री झाली आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझे व त्यांचेत पैसे देण्याघेण्याचा आर्थिक व्यवहार नाही व त्यांचे सोबत माझे वैर नाही. लोकसेवक दिंगबर शिंदे किंवा गट शिक्षण अधिकारी व्यवहारे यांनी स्वतः किवा इतरामार्फत लाच स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यांवी अशी तक्रार दिली त्यांनतर आम्ही तक्रारदार यांना उदईक रोजी सर्व सापळा लोहा येथे येवून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे या बाबत सुचना देवून घरी जाण्याची परवानगी दिली. त्या अनुषंगाने पुढील गोपनिय कामाकरीता दोन शासकीय पचांची आवश्यकता असल्याने आम्ही नांदेड पाटबंधारे विभाग उत्तर, ता. जिल्हा नांदेड येथील दोन शासकीय पंच यांना बोलावून घेतले.

त्यांनतर दिनांक 13/02/2026 रोजी सकाळी दोन्ही पंच व सापळा पथक सर्व ला.प्र.वि कार्यालय येथे सकाळी 10:00 वाजता हजर आले. सापळा कार्यवाही करीता लागणारे सर्व साहित्य घेवून दोन्ही पंच व सापळा पथक हे खाजगी वाहन क्रमांक एम.एच.24 व्हि 5127 वाहनाने वेळ 11:40 वाजता रवाना झाले. व लोहा शहराच्या दोन किलो मिटर अंतरावर पार्डी शिवारात सुरक्षित ठिकाणी 12:45 थांबलोत तेव्हा तक्रारदार हे त्या ठिकाणी आले. त्यांनतर आम्ही दोन्ही पंच यांना तक्रारदार व सापळा पथकातील अंमलदार पोहेकाँ/114 राजेश राठोड, पोकाँ/1487 ईश्वर जाधव, असे सापळा पथक यांची ओळख करून दिली. त्यांनतर तक्रारदार नलबलवार यांनी लोकसेवक यांच्या विरूध्दची तक्रार दोन्ही पंचास तोंडी सांगीतली त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार नलबलवार यांनी दिनांक 12/02/2026 रोजी दिलेली तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री करून त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यांनतर



पोलीस ठाणे लोहा जि. नांदेड
सत्यमेव जयते

तक्रारदार, दोन्ही पंच व आमचे वक्तव्य घेतले.त्यानंतर लाचमागणी पडताळणी कामी तक्रारदार नलबलवार व पंच क्रमाक 1. दासरे यांना लोकसेवक दिंगबर शिंदे शिक्षक यांची भेट घेण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करून 15:22 वाजता गट शिक्षण अधिकारी कार्यालय लोहा येथे रवाना केले.त्यानंतर 16:04 वाजताचे सुमारास तक्रारदार नलबलवार व पंच क्रमाक 1. दासरे हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार नलबलवार व पंच क्र. 1 दासरे यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, आम्ही दोघे गट शिक्षण अधिकारी कार्यालय लोहा येथे गेले असता त्या ठिकाणी कार्यालयात शिक्षण विस्तार अधिकारी तसेच प्रभारी गट शिक्षण अधिकारी सतिश व्यवहारे व केंद्र प्रमुख दिंगबर शिंदे हे हजर होते. तक्रारदार यांनी व्यवहारे सर यांना विचारणा केली की सर माझे अर्जित रजा 45 दिवस मंजुर करण्यात यावी या बाबत विनंती केली तेव्हा त्यांनी लोकसेवक व्यवहारे यांनी तक्रारदार यांना म्हणाले तुम्ही मुख्याधापकाचा चार्ज घ्या, मी तुमची रजा मंजुर करतो असे सांगितले त्यानंतर तक्रारदार हे म्हणाले की,,, घेवून येतो काही तरी थोडे तरी,,, तेव्हा व्यवहारे सर म्हणाले की "काही घ्यायच नाही,,,, आदी ते चार्ज घ्यायच नंतर रजा,,,, मंजूर करत नाही ,,,,,, उपस्थित करून घेत नाही ,,,,,त्यांनतर तक्रारदार व पंच क्रं.1 कार्यालयाच्या बाहेर येत असंताना पाठिमागून लोकसेवक दिंगबर शिंदे यांनी तक्रारदार याना बाजुस या असे बोलून "इकड या पुडच बोलू नका तुम्हाला पुढच कोण बोला म्हणल,,, तिथ येवून साहेबा बरोबर बोलायच असते काय,,,? जे काय दयायचे ते ,,,,जे काय दयायचे दोन तीन हजार रूपये,,, दया ,,,,नसले तर राहु दया ,,,,जि.पी एफ, च पुन्हा मला घरला आणुन दया,,,,,,, असे सांगितले त्यांनतर तक्रारदार म्हणाले की हो चालेल,,, त्यांनतर लोकसेवक शिंदे म्हणाले की आत दोन तीन हजार असले तर आणुन दया ,,,,पण ते आफवा कुठ होवू नये अस,,,,, तेव्हा तक्रारदार म्हणाले नाही नाही काही होत नाही ,,,,,मी घेवून येतो ,,,,,तेव्हा लोकसेवक शिंदे म्हणाले की काही हरकत नाही आज या,,, उदया,,, या की तीन दिवसाला या असे बोलणे झाले त्यानंतर आम्ही दोघे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले." त्यानंतर तक्रारदार नलबलवार यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी पंच क्रं. 1 यांनी सांगितल्या प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक व्यवहारे व लोकसेवक शिंदे यांच्या भेटी दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता लाचमागणी पडताळणीत लोकसेवक सतिष व्यवहारे यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली नसल्याचे दिसुन आले व त्यानंतर शिक्षक दिंगबर शिंदे यांनी तक्रारदार यांना बाजुस घेवून जावून दोन तीन हजार असले तर आनुन दया असे बोलून तक्रारदार यांचे अर्जित रजा मंजुर करून देण्यासाठी तीन हजार रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सर्वानुमते पुढील सापळा कार्यवाही दिनांक 16/02/2026 रोजी करण्याचा निर्णय घेतला.

दिनांक 16/02/2026 रोजी सकाळी 09:00 वाजता सर्व सापळा पथक व नवीन सापळा पथकातील सदस्य पोहेकाँ/संतोष वच्चेवार शासकीय वाहनाने लोहा येथे 09:45 वाजता सुरक्षित ठिकाणी आलोत. त्यानंतर तक्रारदार यांना विचारणा केली की लोकसेवक हे सद्या कुठे भेटतील मला सांगता येणार नाही त्यामुळे आम्ही फोन लावण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर 10:04 वाजता तक्रारदार यांच्या मोबाईल क्रमांक 9922633763 या नंबर वरून लोकसेवक दिंगबर शिंदे यांचा मोबाईल क्रमांक 9860113736 या यावर फोन लावला असता त्यांनी दहा मिनिटात कार्यालयात येतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे आले तेव्हा तक्रारदार नलबलवार यांनी त्यांचे जवळील 3000/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या सहा नोटा पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाहीचे अनुषंगाने पोहेकाँ/संतोष वच्चेवार यांना दिलेल्या सुचना प्रमाणे त्यांनी तक्रारदार व दोन्ही पंचास अँन्थ्रासिन पावडरचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. व लाच रक्कम 3000/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या सहा नोटा यास अँथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार नलबलवार यांचे शर्टच्या डाव्या बाजुस खिशात ठेवले. त्यानंतर पोकाँ/जाधव यांना डिजीटल व्हाईस रेकाँर्डर चालु करुन देण्याची सुचना दिली. त्यानंतर सर्व सापळा पथक यांना सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने सविस्तर सुचना दिल्या. पोकाँ/जाधव यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकाँर्डर 10:14 वाजता चालु करुन तक्रारदार व पंच क्रं. 1 यांना गट शिक्षण आधिकारी कार्यालय लोहा येथे केंद्र प्रमुख दिगांबर शिंदे यांची भेट घेण्यासाठी त्यांच्याकडे रवाना केले. सर्व सापळा पथक शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ गट शिक्षण अधिकारी कार्यालय लोहा येथे पोहचलो. तेव्हा तक्रारदार यांनी आमचे सुचनेप्रमाणे सर्व सापळा पथक आजुबाजुला आल्याची खात्री करुन लोकसेवक शिंदे यांची भेट घेण्यासाठी गट शिक्षण अधिकारी कार्यालय येथे लोकसेवक दिंगबर शिंदे यांचेकडे गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी कार्यालयाच्या बाहेर येवून 10:25 वाजता लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी तक्रारदार यांचे गळयातील डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर 10:31 वाजता बंद केले. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ गट शिक्षण अधिकारी कार्यालयात लोहा येथे पोहचलो. त्यानंतर तिथे असलेले पंच क्र. 1 यांना आम्ही विचारले की, तक्रारदार यांचेकडे कोणी लाचेची मागणी केली व लाचेची रक्कम कोणी स्विकारली तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगीतले की, हे केंद्र प्रमुख दिंगबर शिंदे यांनी तक्रारदार यांना

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NAGNATH SHANKAR AYALANE(I (Inspector)) / POBN90177

PI अर्चना ... ACB नांदेड

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे लोहा जि. नांदेड

(सत्यमेव जयते)

(... सोनकांबळे)
**पो.उप निरीक्षक**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NAGNATH SHANKAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN90177